महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

जा.क्र. : काऔसंवि/ब/ककनिस/३६१९६

दिनांक :०८/१२/२०११

## परिपत्रक

विषय: कर्मचारी कल्याण निधीमधून आर्थिक मदत, रोख पारितोषिक इत्यादी मिळण्याबाबत सादर करण्यात येणारे प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयातील उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांच्यामार्फत पाठविण्याबाबत.

*************

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीच्या वतीने कर्मचारी व त्यांच्या अवलंबितांसाठी कल्याणकारी निर्णय वेळोवेळी घेण्यात येत असतात व त्यानुषंगाने क्षेत्रीय कार्यालयाकडून क.क.निधीमधून आर्थिक मदत, रोख पारितोषिक इत्यादी मंजूर करण्याबाबतचे प्रस्ताव सांघिक कार्यालयाकडे सादर करण्यात येतात. तथापि, बरेचदा असे पाठविण्यात येणारे प्रस्ताव त्रुटींचे व अर्धवट स्वरुपाचे असल्यामुळे तत्परतेने निकाली काढणे गैरसोईचे होते, त्यामुळे त्याचा लाभ संबंधीत कर्मचाऱ्यास तातडीने होऊ शकत नाही.

कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५२ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार नव्याने २२ कल्याणकारी योजनांचा समावेश करण्यात आला असून सदर योजनांपोटी आर्थिक मदत, रोख पारितोषिक इत्यादी मंजूर करण्याबाबत विभागीय, मंडल कार्यालयाकडून सादर करण्यात येणारे प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयातील उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचेमार्फत सादर करणे जेणे करुन सदर प्रस्तावाची उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांच्या पातळीवर छाननी होऊन काही त्रुटी असल्यास त्या त्रुटींची पूर्तता करुन परिपूर्ण स्वरुपाचा प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांचेकडे सादर करुन तातडीने मंजुरी कळविणे सोईचे होईल.

सबब, सर्व क्षेत्रीय कार्यालयातील विभागीय, मंडल प्रमुखांना विनंती करण्यात येते की क.क.निधी मधून आर्थिक मदत, रोख पारितोषिक इत्यादी मंजूर करण्याबाबतचे सर्व प्रस्ताव थेट सांघिक कार्यालयास न पाठविता क्षेत्रीय कार्यालयातील उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांच्यामार्फत पाठविण्यात यावे.

सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येऊन परिपत्रकाचा त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

किशोर पवार

सदस्य / सचिव, क.क.नि.समिती तथा
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत सविनय सादर :
कार्यकारी संचालक (मा.स.), महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.

प्रत सस्नेह :
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण, सांघिक कार्यालय, मुंबई.
-- आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या कंपनी अंतर्गत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांची आपल्या पातळीवर छाननी करून फक्त परिपूर्ण असलेले प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यात यावे.

प्रत :
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.

D:\old d drive\madhuri\SWFC\52 baithak karyvrutant.doc